# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०५/०८/२०१६.

## १) घरातील सोन्याचे दागिने व नगदी पैश्याची चोरी. :—

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी ११.३० ते १३.०८ वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. कल्पना अशोक किरपानकर वय ४३ वर्ष रा. खरबी ही घराचे सामोरील दाराला कुलुप लावुन बाहेर गेली असता यातील अनोळखी आरोपीतांनी सुना मौका पाहुन समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून भिंतीमध्ये असलेल्या आलमारी मधील स्टीलचे डब्यातील सोन्याची नथ ३ ग्रॅम, सोन्याचा टॉप्स ३ ग्रॅम, सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, व नगदी ५०,०००/—रू. असा एकुण ६५,०००/—रू. चा माल चोरून नेल्याने असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

## २) बॅटरीची चोरी. :—

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने राईसमीलचे खुल्या आवारात असलेल्या इंडस टावर लि. कंपनीच्या टॉवर करीता लावलेल्या जनरेटरच्या लॉक तोडुन त्यात लागलेली एस. एन. फुकोना कंपनीची बॅटरी कि. ६,००/—रू. ची विजय राईसमीलच्या मागे पवनी येथुन चोरून नेल्याने असे फिर्यादी आशिष नरसिंगराव खेडामडे वय २८ वर्ष रा. मनिष नगर नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

## ३) घरातील सोन्याचे दागिने व नगदी पैश्याची चोरी . :—

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सोनबा माधवराव खोकले वय ४५ वर्ष रा. सकरला हा आपल्या शेतातील कामाने दि. ०४/०८/०१६ ला सकाळी ०७.०० वा. घराला कुलुप लावुन बाहेर गेला असता दुपारी गावातील इसम भगवान शामराव डोये यांचे कडुन समजले कि, दाराचा कुलुप तुटलेला आहे. या खबरेवरून फिर्यादीने घरी जावुन पाहीले असता कुलुप तोडुन दार उघडा होता. घरातील आलमारीची शहानिशा केली असता १ सोन्याची गळसुली ७ गॅम, सोन्याचा बि—या ०४ ग्रॅम, सोन्याचा पदक ०४ ग्रॅम, ७० पिटीव सोन्याचे मनी २ ग्रॅम, सोन्याचे पदक ०३ ग्रॅम, सोन्याचा डोरला ०५ ग्रॅम, व नगदी ३०,०००/—रू. असा एकुण ६६,५००/—रू. चा माल कोनीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५४,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) संगनमत करून भांडण व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी ०८.१६ वा. दरम्यान फिर्यादी शालीकराम तानाजी गि—हेपुंजे वय ३८ वर्ष रा. टांगा हे आपल्या घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन जागेच्या वादावरून भांडण करून फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १४३,२९४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

५) **अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. सिहोरा, गोबरवाही, व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५६ लिटर हातभट्टी दारू + २० किलो सडवा कि. ४,१७०/—रु. व देशी दारू १ लिटर ४४० मिली. किमती ४००/—रु. असा एकुण कि. ४,५७० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिति अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.